# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

क्रमांक१९१५७/ग-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : डिसेंबर, २०२१.
15 DEC 2021

::परिपत्रक::

विषय : सन २०२१ च्या हिवाळी अधिवेशन कालावधीत विधान भवन, मुंबई येथे प्रवेश मिळण्यासाठी कोरोना विषाणूचा संसर्ग टाळण्याच्या दृष्टिने करावयाच्या RT-PCR चाचणीबाबत..

महाराष्ट्र विधानमंडळाचे आगामी सन २०२१ चे हिवाळी अधिवेशन बुधवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२१ रोजी पासुन विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आले आहे.

कोविड - १९ प्रतिबंधात्मक लसीचे दोन्ही डोस घेतलेले आहेत त्यांना संसर्ग होण्याची शक्यता कमी असली तरी, काही जण कोरोना विषाणूंचे वाहक असू शकतात. त्यामुळे अधिवेशनाकरिता उपस्थित राहणाऱ्या सर्वांच्याच सुरक्षिततेसाठी कोविड-१९ प्रतिबंधात्मक लसीचे दोन्ही डोस घेऊन १४ दिवस पूर्ण झालेले मान्यवर व अधिकारी/कर्मचारी यांचीच कोविड-१९ संदर्भातील RT-PCR चाचणी करण्याबाबतचा निर्णय विधानसभा आणि विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीच्या दिनांक २९ नोव्हेंबर, २०२१ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आला असून उक्त निर्णयानुसार कार्यवाही करण्याबाबत मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी निदेश दिले आहेत.

त्याअनुषंगाने विधान भवन, मुंबई येथील मुख्य प्रवेशद्वारा नजीक कोविड-१९ प्रतिबंधात्मक लसीचे दोन डोस घेऊन १४ दिवस पूर्ण झालेल्या मा.पीठासीन अधिकारी, मा.मुख्यमंत्री, मा.उप मुख्यमंत्री, तसेच सर्व मा.मंत्री, मा.राज्यमंत्री, दोन्ही सभागृहांचे मा.विरोधी पक्षनेते व दोन्ही सभागृहांचे सर्व सन्मा. सदस्य, सर्व मा. मंत्री व राज्यमंत्री यांच्या आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी आणि मंत्रालयीन व या सचिवालयातील अधिकारी / कर्मचारी, पत्रकार, अत्यावश्यक सेवा कर्मचारी यांच्याकरीता दिनांक २० व २१ डिसेंबर, २०२१ तसेच, पुढील आठवडयासाठी दिनांक २५ व २६ डिसेंबर, २०२१ रोजी सकाळी ०८.०० ते सायं ०६.०० वाजेपर्यंत RT-PCR चाचणी करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. यामध्ये दिनांक २० डिसेंबर, २०२१ रोजी सकाळी ८.०० ते ११.०० या कालावधीत सुरक्षा व्यवस्थेतील सर्व अधिकारी व सुरक्षा रक्षक यांची RT-PCR चाचणी करण्यात येईल. सकाळी ११.०० नंतर इतरांच्या RT-PCR चाचण्या घेण्याचे सुरु करण्यात येईल.

तसेच, उक्त सर्व मान्यवरांना असेही कळविण्यात येते की, ते त्यांच्या वास्तव्याच्या नजीक असलेल्या अधिकृत प्रयोगशाळेचा दिनांक २० डिसेंबर, २०२१ व २५ डिसेंबर, २०२१ रोजीचा पुढील आठवडयासाठी किंवा तद्नंतर केलेल्या RT-PCR चाचणीचा अहवाल देखील या सचिवालयास सादर करु शकतात (RT-PCR चाचणी करण्यापूर्वी कोविड-१९ प्रतिबंधात्मक लसीचे दोन डोस घेऊन १४ दिवस झालेले असावेत.) व जवळपास तशी

सुविधा उपलब्ध होत नसल्यास विधान भवन, मुंबई येथे उपरोक्त प्रमाणे करण्यात आलेल्या व्यवस्थेचा वापर करु शकतात. सन्मा.सदस्यांनी अधिवेशनास उपस्थित राहण्याकरिता प्रवास करित असताना कोरोना विषाणू संसर्ग टाळण्यासाठी वाहनचालक व एक सहप्रवासी अशा मर्यादीत व्याक्तींना सोबत ठेवावे. त्या दोघांची वरीलप्रमाणे चाचणी केलेली असावी व त्यांचा अहवाल निगेटीव्ह असेल तरच त्यांना प्रवासात सोबत ठेवावे.

सदरहू सुविधेचा वापर करण्याकरिता सर्व संबंधितांनी http://mls.org.in/covid-report/rtpcr.html या लिंकवर जाऊन तेथे देण्यात आलेल्या वर्गवारीनुसार नोंदणी करून टोकन क्रमांक प्राप्त करून घ्यावा व सदरहू टोकन क्रमांक विधानभवन, मुंबई येथील मुख्य प्रवेशद्वाराबाहेर उभारण्यात आलेल्या कोविड-१९ चाचणी केंद्र येथे सांगून व स्वत:चे ओळखपत्र दाखवून कोविड-१९ चाचणी करून घ्यावी. विधान भवन, मुंबई येथे प्रवेश करण्याकरीता वरीलप्रमाणे केलेल्या चाचणीचा अहवाल सादर करणे अनिवार्य राहील.

विधानमंडळ सचिवालयामार्फत विधान भवन, मुंबई येथे करण्यात आलेल्या चाचणीचा अहवाल विधानमंडळ सचिवालयामार्फत उपलब्ध करून देण्यात येईल. मात्र ज्यांनी विधान भवन येथील चाचणी केंद्राव्यतिरिक्त इतर अधिकृत प्रयोगशाळेतून RT-PCR चाचणी केली असेल त्यांनी त्यांचा अहवाल विधान भवन येथे प्रवेश करताना सोबत ठेवावा. तसेच, विधान भवन येथे प्रवेश करीत असताना सामाजिक अंतर राखणे सोईचे व्हावे याकरीता नियोजित वेळेपूर्वी उपस्थित राहावे.

(राजेन्द्र भागवत)
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

याची प्रत :

(१) दोन्ही सभागृहांचे सर्व सन्माननीय सदस्य.

(२) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.

(३) मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

(४) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

(५) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

.. ३/-

(६) मा.उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

(७) मा.विरोधी पक्षनेता महाराष्ट्र विधानपरिषद/महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव.

(८) मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/विशेष कार्य अधिकारी.

(९) मंत्रालयीन सर्व विभागातील प्रधान सचिव/ सचिव

(१०) महाराष्ट्र विधानमंडळातील सर्व अधिकारी व कर्मचारी, विधान भवन, मुंबई.

(११) समादेशक अधिकारी, अग्निशमन विभाग, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.

(१२) विधानमंडळातील सर्व पक्ष कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी, विधान भवन, मुंबई.

(१३) व्यवस्थापक, उपहारगृह, विधान भवन, मुंबई

(१४) मालमत्ता व्यवस्थापक, ग-२ कक्ष, विधान भवन, मुंबई.

(१५) शाखा अभियंता, सा.बा.विभाग (स्थापत्य), विधान भवन, मुंबई.

(१६) शाखा अभियंता, सा.बा.विभाग (विद्यूत), विधान भवन, मुंबई.

याची प्रत कार्यवाहीसाठी

(१) मुख्य सुरक्षा अधिकारी, विधान भवन, मुंबई.

(२) सह सचिव (समिती) तथा विशेष कार्य अधिकारी ,संगणक शाखा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन,मुंबई.